# ॥ श्री मारुती स्तोत्र ॥

भीमरुपी महारुद्रा, वज्रहनुमान मारुती ।
वानरी अंजनीसूता, रामदूता प्रभंजना ॥१॥
महाबळी प्राणदाता, सकळां उठवी बळें ।
सौख्यकारी दु:खहारी, दूत वैष्णवगायका ॥२॥
दीननाथा हरीरुपा, सुंदरा जगदंतरा ।
पातालदेवताहंता, भव्यसिंदूरलेपना ॥३॥
लोकनाथा जगन्नाथा, प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला, पावना परितोषका ॥४॥
ध्वजांगे उचली बाहों, आवेशे लोटला पुढे ।
काळाग्नि,काळरुद्राग्नि, देखतां कांपती भयें ॥५॥
ब्रम्हाडें माइली नेणों, आंवळे दंतपंगती ।
नेत्राग्नि चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळे ॥६॥
पुच्छ तें मुरडिलें माथा, किरीटी कुंडलें बरी ।
सुवर्णकटिकांसोटी, घंटा किंकिणि नागरा ॥७॥
ठकारे पर्वताऎसा, नेटका सडपातळू ।
चपळांग पाहतां मोठे, महाविद्युल्लतेपरी ॥८॥
कोटिच्या कोटि उड्डाने, झेंपावे उत्तरेकडे ।
मंद्राद्रीसारिखा द्रोणू, क्रोधे उत्पाटिला बळें ॥९॥
आणिला मागुता नेला, आला गेला मनोगती ।
मनासी टाकिलें मागें, गतीसी तुळणा नसे ॥१०॥
अणूपासोनि ब्रम्हांडायेवढा होत जातसे ।
तयासी तुळाणा कोठें, मेरुमांदार धाकुटे ॥११॥
ब्रम्हांडाभोंवते वेढे, वज्रपुच्छें करु शके ।
तयासी तुळणा कैची, ब्रम्हांडी पाहतां नसे ॥१२॥
आरक्त देखिले डोळां, ग्रासलें सूर्यमंडळा ।
वाढतां वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा ॥१३॥
धनधान्यपशुवृद्धि, पुत्रपौत्र समग्रही ।
पावती रुपविद्यादि, स्तोत्रपाठेंकरुनियां ॥१४॥
भूतप्रेतसमंधादि, रोगव्याधि समस्तही ।
नासती तुटती चिंता, आनंदे भीमदर्शने ॥१५॥
हे धरा पंधराश्र्लोकी, लाभली शोभली बरी ।
दृढदेहो निसंदेहो, संख्या चंद्रकळागुणे ॥१६॥
रामदासी अग्रगणू, कपिकुळासि मंडणू ।
रामरुपी अंतरात्मा, दर्शनें दोष नासती ॥१७॥